# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २२/०१/२०२५ (बुधवार) दुपार**

---

## अवैधरीत्या घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पोस्टे कन्हान:— दिनांक २१/०१/२०२५ चे १२/१४ वा. ते दि. २१/०१/२०२५ चे १३.४० वा. दरम्यान पोस्टे कन्हान येथील पो. स्टे. परीसरात पेट्रोलींग व अवैध धंद्यांवर कारवाई करीता पेट्रोलींग करीत असता खदान नं. ०३ येथे मुखबिरद्वारे माहिति मिळाली कि, खदान नं. ०३ येथे राहणारा राकेश मरकाम हा काल रात्री दरम्यान खदान नं. ०३ परीसरात हातात तलवार घेवुन लोकांमध्ये दहशत निर्माण करुन फिरत होता सध्या तो आपले घरी आहे अश्या गोपनीय माहिती वरुन सदर **आरोपी नामे— राकेश जिवनराम मरकाम वय २४ वर्षे रा. खदान नं. ०३, ता. पारशिवनी** याचे घराची घरझडती घेतली असता पीतळी धातुची तलवार मिळुन आल्याने शस्त्राबाबत परवाना विचारला असता परवाना नसल्याचे सांगितले. आरोपीचे ताब्यातून लोखंडी धातुची लांबी ३१ इंच मुठेची लांबी ०६ इंच पात्याची रुंदी ०१ इंच असलेली अंदाजे ५०० रु किंमतीची जप्त करण्यात आली. आरोपीविरूद्ध पोस्टे कन्हान येथे कलम ४, २५ भाहका १३५ म.पो. का अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर